


दैनिक

# धर्मयोध्दा

मातीशी इमान राखणारे...
सत्यासाठी लढणारे...

संपादक :- रामेश्वर गणपतराव शिंदे मो. नं.९४२१४७९८८१ MAHMAR/2023/90786 dharmaayoddha@gmail.com

* परभणी * वर्षे ३ रे * अंक १५४ * शनिवार,दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ * पाने ४ * किंमत ३ रुपये

* PARBHANI *YEAR 3 * ISSUE 154 * SATURDAY 29 NOVEMBAR 2025 * PAGES 4 * RS 3

## गंगाखेड, पूर्णा तालुक्यातील वाळुघाटांचा ई-लिलाव

### इच्छुकांनी लिलावात सहभागी व्हावे - जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

**परभणी-** जिल्ह्यातील गंगाखेड उपविभागांतर्गत असलेल्या गंगाखेड व पूर्णा तालुक्यातील राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण, महाराष्ट्रद्वारे अनुमती प्राप्त एकुण १७ वाळूघाटांचा २ ते ३ वाळूगटनिहाय ई-निविदासह ई-लिलाव दि. २६ नोव्हेंबर २०२५ ते ५ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजीत करण्यात आला आहे. तरी सर्व इच्छुकांनी वाळू लिलावात सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

शासन निर्णय दि. ८ एप्रिल २०२५ मधील वाळू/रेती निर्गती धोरणानुसार जिल्हयातील गंगाखेड उपविभाग अंतर्गत असलेल्या गंगाखेड तालुक्यातील ९ वाळूघाटांचा व पूर्णा तालुक्यातील ८ वाळूघाटांचा भौगोलिकदृष्ट्या सोईस्कर असणा-या २ ते ३ वाळू घाटांचा आयोजीत करण्यात आलेल्या ई-निविदासह ई-लिलावात पात्र लिलावधारकांनी भाग घेण्यासाठी याद्वारे जिल्हा प्रशासनाकडून जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

वाळू लिलावाच्या अटी व शर्ती, वाळूची हातची किंमत व इतर सर्व माहिती खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी तसेच सर्व उपविभागीय अधिकारी व सर्व तहसिलदार जिल्हा परभणी यांचे कार्यालयामध्ये आणि https://parbhani.gov.in तसेच http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

लिलावानंतर यशस्वी लिलावधारकाला एकूण साठ्याच्या १० टक्के वाळू पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थ्यांना मोफत द्यावी लागेल. तसेच शासन निर्णयातील तरतूदींन्वये वाळू लिलाव धारकांकडून शासनास जमा करण्यात येणाऱ्या स्वामित्वधनाच्या रकमेच्या १० टक्के रक्कम ही जिल्हा खनिज प्रतिष्ठानसाठी अंशदान म्हणून घेण्यात येणार आहे. सदर निधीमधून ग्रामपंचायत क्षेत्रातील रस्ते, आरोग्य सेवा, शिक्षण, महिला व मुलांचे कल्याण, वयोवृद्ध व दिव्यांगाचे कल्याण, स्वच्छता, कृषी, उर्जा, जलसिंचन इ. विकास कामांना निधी उपलब्ध होत असतो. तरी सदर वाळू लिलावात सर्व इच्छुकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

## पोलीस अधिक्षक, लातूर यांच्या संकल्पनेतुन पोलीस-विद्यार्थी संवादचे दयानंद विज्ञान महाविद्यालयात आयोजन

**(मनोज पाटील/दै.धर्मयोध्दा)**

**लातुर-** याबाबत अधिक माहिती अशी की, श्री. अमोल तांबे, पोलीस अधिक्षक, लातूर यांच्या संकल्पनेतुन लातूर जिल्हयामध्ये पोलीस-विद्यार्थी संवाद चे आयोजन करण्यात येत आहे. आजपावेतो लातूर शहरात एकून १६ शाळा-महाविदयालयांना भेटी देवून पोलीस-विद्यार्थी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून आगामी काळात जिल्हयातील सर्वच शाळा-महाविद्यालयांमध्ये सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. दि.२८ नोव्हेंबर २०२५ रोजी लातूर जिल्हा पोलीस, दयानंद शिक्षण संस्था, लातूर व दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने ''पोलीस-विद्यार्थी संवाद'' कार्यक्रमाचे आयोजन दयानंद सभागृहात करण्यात आलेले होते. या कार्यक्रमप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, प्रमुख मार्गदर्शक श्री. समोरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांनी अकरावीच्या विद्यार्थ्यांना विविध कायद्याबद्दल माहिती दिली. तसेच विविध कायदे, बालगुन्हेगारी, अंमली पदार्थ व सायबर सुरक्षा याबद्दलही जनजागृती केली. तसेच महाविद्यालय परिसरामध्ये होणाऱ्या गुन्हयांसाठी कायद्यांमध्ये असणाऱ्या तरतुदी, लैंगिक अत्याचारासंबंधी होणारे गुन्हे व त्याची शिक्षा याबद्दल विद्यार्थ्यांना चित्रफित व च्या स्वरूपात माहिती दिली. महाविद्यालयीन विद्यार्थीनीसाठी पोलीस विभागातर्फ असणाऱ्या विविध सुविधा, हेल्पलाइन नंबर ११२, १०९८, दामिनी पथक यासंबंधीही माहिती देण्यात आली. तणावमुक्त जीवन जगण्यासाठी व गुणवत्ता वाढीसाठी विद्यार्थ्यांनी गुन्हेगारी प्रवृत्तीपासून कसे लांब राहिले पाहिजे यावरही मार्गदर्शन करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शिस्तीचे व कायद्याचे पालन करण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. भाऊसाहेब सरवदे यांनी केले तर आभार पर्यवेक्षिका डॉ. संध्या वाडीकर यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. सदरचा कार्यक्रम मा.श्री. अमोल तांबे, पोलीस अधिक्षक, लातूर यांचे संकल्पनेतुन श्री. मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधिक्षक, लातूर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर, श्री. समाधान चवरे, पोलीस निरीक्षक पोस्टे एमआयडीसी पोअं. योगेश पिसदुरकर व दयानंद शिक्षण संस्था, दयानंद विज्ञान महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमानाने आयोजीत करण्यात आला होता.

## लग्नात जिल्हा परिषद शाळेला पुस्तकांची प्रति भेट सिराळ - कोल्हे परिवाराचा अनोखा पायंडा

**(संतोष तायडे/ दै.धर्मयोध्दा)**

**बोरी-** समाजात वाचन संस्कृती अधिकाधिक रुजावी. वाचनाच्या पुस्तकाच्या प्रथा परंपरा निर्माण व्हाव्यात. या भावनेतून मुरलीधर शिराळ मांडाखळी यांनी आपल्या मुलाच्या लग्नात वाचन संस्कृतीचे कार्य करणाऱ्या अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्राकडे अवांतर वाचनाची पुस्तके भेट दिली. विशेष म्हणजे पुस्तकांची ही भेट देऊनच दुसऱ्या क्षणाला




पहिली मंगलाष्टका सुरू केली. जमलेल्या पाहुणे व मित्र परिवाराला पुस्तक व वाचन संस्कृतीला प्राधान्य द्यावे . हा संदेश त्यांनी जाणीवपूर्वक या कृतीतून दिला . मिळालेली ही पुस्तकाची भेट जि.प.के. प्रा.शा सावरगाव ता.मानवत या शाळेला दिली. शिरीष लोहट, बलभीम माथले यांनी ही संकल्पना मांडून पूर्णत्वास नेली .यावेळी विनोद शेंडगे, संतोष खामकर, मल्लिकार्जुन देवरे, मुरलीधर सिराळ ,उद्धव घाटूळ,विशाल कोल्हे सर, प्रा. टी. जी.सिराळ सर, परभणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती पंढरीनाथ घुले पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती.

## फुलकळस येथे अखंड शिवनाम सप्ताह व शिवपुराण कथेला प्रारंभ

**(वजीर पठाण/दै.धर्मयोध्दा)**

**ताडकळस** - पूर्णा तालुक्यातील फुलकळस येथे महिला मंडळाच्या वतीने दि. २७ नोव्हेंबरपासून अखंड शिवनाम सप्ताह व शिवपुराण कथेला भक्तीमय वातावरणात सुरुवात झाली आहे. तब्बल ५० वर्षांची परंपरा लाभलेल्या या धार्मिक उपक्रमाचे राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या सानिध्यात सातत्याने आयोजन होत आहे. यावेळी शिवकथाकार शि.भ. विश्वनाथ स्वामी महाराज पेनुरकर यांचे जंगी स्वागत करण्यात आले. सप्ताहात दररोज पहाटे ४ ते ६ शिवपाठ, ६ ते ८ शिवरुद्राभिषेक, ८ ते १० परमरहस्य पारायण, सकाळी १० ते १२ प्रवचन, दुपारी १२ ते ३ शिवपुराण कथा, ३ ते ५ महाप्रसाद, सायं. ५ वाजता गाथाभजन आणि रात्री ८ ते १० कीर्तन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात श्रद्धा विश्वनाथ स्वामी पेनुरकर, सूनिताताई दत्तात्रय सिंगनवाड चांडोळकर, मंजुषा पाटील दांडेगावकर, निकिता स्वामी करवंदीकर, भाग्यश्री शिवाहार निराकर दाभा, संगीता संतोष पाटील बेंद्रीकर, कावेरीबाई किशनराव मुदखेडे वनभुजवाडीकर आदींचे कीर्तन होणार आहे. गुरुवार, दि. ४ डिसेंबर रोजी सप्ताहाची व शिवकथेची सांगता विश्वनाथ स्वामीजी पेनुरकर यांच्या कीर्तनाने व महाप्रसादाने होईल. भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था पंचफुलाबाई शिराळे, शोभाबाई शिराळे, भाग्यश्रीताई धुळशेटे, पार्वतीबाई शिराळे, संताबाई खंडोजी शिवणकर, यमुनाबाई भाटेगावकर, लक्ष्मीबाई शिराळे यांच्या वतीने करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या सप्ताहात गावातील सर्व महिलांचा उत्स्फूर्त सहभाग असून हा उपक्रम भक्तिभावाने अधिक रंगतदार ठरत आहे. अखंड शिवनाम सप्ताह, परमरहस्य पारायण व शिवपुराण कथेचा महाप्रसादाचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा, असे आवाहन विश्वेश्वर महिला भजनी मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मानवत नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५

### EVM CAND-SET- सिलींग प्रक्रिया पूर्ण

**(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)**

**मानवत-** नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने आज दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी तहसील कार्यालय मानवत येथे मतदान यंत्रांची (CAND-SET) सिलींग प्रक्रिया विधिवत पूर्ण करण्यात आली. निवडणुकीसाठी पात्र ठरलेले उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी तसेच मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार मानवत श्री. पांडुरंग माचेवाड यांच्या समक्ष ही प्रक्रिया पार पडली.

मतदान यंत्र (EVM) मतपत्रिकेसह निवडणुकीसाठी तयार करण्याचे काम नायब तहसीलदार स्वप्ना अंभूरे नियंत्रण अधिकारी व श्री व्ही. आर. मिटकरी पथकप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. ११ टेबलांवर नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांनी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया कशा प्रकारे राबविली जाणार आहे याचे सविस्तर प्रात्यक्षिक उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींसमोर सादर केले.

यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी टेबलनिहाय नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक साहित्य वाटप केले तसेच EVM CAND-SET संदर्भातील सर्व माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमास

मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार श्री. पांडुरंग माचेवाड,

सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार श्री. संजय खिल्लारे,

नायब तहसीलदार तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सौ. स्वप्ना अंभूरे, तसेच तहसील व नगरपरिषदचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## परभणी भाजपमध्ये नव्या दमाच्या नेतृत्वाला मिळत असलेला प्रतिसाद हाच भाजपा संपुष्टात आणण्यासाठी छुपे प्रयत्न करणाऱ्या झारीतील शुक्राचार्यांना ठसत असल्याचा प्रकार; ग्रामीण भागात चर्चेला उधाण

**(सिध्देश्वर गिरी /दै.धर्मयोध्दा)**

**सोनपेठ** - परभणी जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाची संघटनात्मक ताकद दिवसेंदिवस वाढत असून पक्षाच्या धोरणांवर आणि संघटन विस्तारावर होत असलेला भर आता परिणामकारक होताना दिसत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे मार्गदर्शन तसेच जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर,रामप्रसाद बोर्डीकर आणि सुरेश वरपूडकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात पक्षाचे कामकाज अधिक जोमाने पुढे जात आहे.



यामध्ये विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे विद्यमान जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांनी केलेले संघटनात्मक बुथ बांधणीचे काम आणि घर-घर भाजप अभियान. जिल्ह्यातील ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत प्रत्येक कार्यकर्त्याशी संवाद साधत त्यांनी कार्यकर्त्यांचे विस्तृत जाळे उभे केले आहे. कार्यकर्त्यांना साथ, सन्मान आणि संधी देत सर्वसमावेशक नेतृत्वाची पद्धत स्वीकारल्यामुळे भाजपला तळागाळात नवी चालना मिळाली आहे.

भुमरे यांच्या नेतृत्वशैलीचा प्रभाव वाढत असताना काही व्यक्तींना हा बदल मान्य नसल्याने पक्षांतर्गत टीकेचा सूर ऐकू येत असल्याचे दिसत आहे. ''नाचता येईना अंगण वाकडे'' या म्हणीप्रमाणे केवळ वैचारिक तयारी नसलेल्या काही मोजक्या लोकांकडून पक्षाच्या प्रगतीपेक्षा टीकेलाच प्राधान्य दिले जात असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

भुमरे यांनी ग्रामीण पातळीपासून जिल्हा स्तरापर्यंत कार्यकर्त्यांना संघटित करून विकासाभिमुख राजकारणाला गती दिली आहे. सर्व समाज व घटकांना समान प्रतिनिधित्व देत पक्षाच्या विचारधारेचे प्रसार आणि सशक्त संघटन उभे करण्याचे ध्येय ते सातत्याने पूर्ण करत आहेत.

भाजपच्या धोरणांप्रमाणे वरिष्ठ नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू असून जिल्ह्यातील संघटन मजबूत करण्यासाठी घेतलेल्या पुढाकारांना तळागाळातून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. पक्षाचे ध्येय-विचार जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असताना काही व्यक्तींनी केलेली टीका ही केवळ लोकप्रियतेच्या वाढत्या प्रभावाची प्रतिक्रिया असल्याचे निरीक्षकांचे मत आहे.

परभणी भाजपमध्ये नव्या दमाच्या नेतृत्वाला मिळत असलेला प्रतिसाद हा पक्षाच्या भवितव्यातील मजबूत संघटनेचे द्योतक असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.

## रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांची सोनपेठ नगरपालिकेचे उमेदवार संभाजी बोडखे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेचे आयोजन

### सभेला मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे जिल्हाध्यक्ष इंजी सुरेश फड यांचे आवाहन





**(सिध्देश्वर गिरी/ दै.धर्मयोध्दा)**

**सोनपेठ** - नगरपरिषद निवडणुकीचा प्रचार जोर पकडत असताना रिपब्लिकन सेनेतर्फे उमेदवार संभाजी बोडखे यांच्या समर्थनार्थ भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सदरची सभा २९ नोव्हेंबर दुपारी १२ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी होणार असून या सभेत रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर उपस्थित राहणार असून त्यांच्या मार्गदर्शनाने नगरपरिषद निवडणुकीतील प्रचाराला आणखी वेग येणार आहे.

या कार्यक्रमास तालुक्यातील कार्यकर्ते, समर्थक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन रिपब्लिकन सेना परभणी जिल्हाध्यक्ष इंजि. सुरेश फड यांनी केले आहे. ही सभा आगामी नगरपरिषद निवडणुकीतील महत्त्वाचा टप्पा मानली जात असून पक्षाच्या धोरणांची माहिती, विकासनिष्ठी भूमिका आणि परिवर्तनाचा संदेश या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचविला जाणार आहे.

जिल्हाध्यक्ष इंजि सुरेश फड यांनी या सभेच्या आयोजनाबद्दल बोलताना सांगितले की,''सोनपेठमध्ये पारदर्शक,प्रामाणिक आणि सर्वसमावेशक प्रशासन देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि संविधानिक मूल्यांवर आधारित विकास हा आमचा मार्ग असेल.शिवसेनेसोबत आमची युती आहे आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास खाते असून त्याच्या माध्यमातून आम्ही शहराच्या विकासास गती प्राप्त करून देणार आहोत मात्र येथील स्थानिक लोकांना आमच्या नावाची एलर्जी आहे मात्र बहुजन समाज हे विसरणार नाही''


तत्पूर्वी शहरात जनसंपर्क मोहिम,पोस्टर रॅली आणि कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली.रिपब्लिकन सेनेच्या या सभेकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.सभेमुळे प्रचारात आणखी उर्जा संचारेल,असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

## रिपब्लिकन सेनेच्या जिल्हाध्यक्षपदाची धुरा इंजि. सुरेश फड यांच्या हाती

### ओबीसींचे सक्षम नेतृत्व आणि विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे पक्षात उत्साहाची नवीन लाट

**(सिध्देश्वर गिरी / दै.धर्मयोध्दा)**

**सोनपेठ-** परभणी जिल्ह्यात रिपब्लिकन सेनेच्या संघटनात्मक बांधणीला अधिक वेग मिळणार असून त्या दिशेने महत्त्वाचा निर्णय घेत पक्ष नेतृत्वाने उच्चशिक्षित, दूरदर्शी आणि विकासाभिमुख व्यक्तिमत्व असलेल्या इंजि. सुरेश फड यांची जिल्हाध्यक्षपदी निवड केली आहे. त्यांच्या या नियुक्तीचे जिल्हाभरात स्वागत होत असून कार्यकर्त्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण आहे. इंजि. सुरेश फड हे गेल्या अनेक वर्षांपासून ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. संघटना, सामाजिक बांधिलकी आणि लोकहिताच्या प्रश्नांवर आवाज उठवण्याचे त्यांचे सातत्यपूर्ण काम पाहता



पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर विश्वास दाखवला आहे. पक्षाच्या अंतर्गत झालेल्या चर्चेनंतर त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब होताच विविध तालुक्यांतून त्यांना शुभेच्छांचा वर्षाव सुरू झाला. जिल्ह्यातील युवकांनी विशेषतः या निर्णयाचे स्वागत केले असून, ''शिक्षित नेतृत्व जिल्ह्याचे राजकीय स्वरूप बदलू शकते'' असा विश्वास अनेकांनी व्यक्त केला. इंजि. सुरेश फड यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन सेना केवळ राजकीय पक्ष न राहता वंचित, मागास आणि सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणारा सक्रिय जनआंदोलनाचा मंच बनेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. निवडीनंतर प्रतिक्रिया देताना सुरेश फड म्हणाले, ''ही केवळ पदाची जबाबदारी नाही तर लाखो बहुजन, ओबीसी,वंचित आणि सामान्य नागरिकांचा विश्वास आहे. रिपब्लिकन सेनेची विचारधारा म्हणजे संघर्ष,समता आणि न्याय. ती अधिक ताकदीने पुढे नेण्याचे काम मी निर्धाराने करणार आहे.'' त्यांच्या या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. आतापर्यंत शांत असलेले ग्रामीण भागातील रिपब्लिकन कार्यकर्ते पुन्हा संघटित झाले असून पक्षाला नवचैतन्य मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. रिपब्लिकन सेनेच्या वतीने जिल्हाभर युवा संवाद, संघटन विस्तार आणि सामाजिक हक्क संरक्षण मोहीम हाती घेतली जाणार असून सुरेश फड यांच्या नेतृत्वात हा वेग आणखी वाढेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे. जिल्हाभरातून मिळणाऱ्या प्रतिसादातून एकच संदेश स्पष्ट होतो ''ओबीसींचा आवाज आता अधिक बुलंद होणार आणि नेतृत्व अनुभवाऐवजी संघर्ष आणि शिक्षणावर उभे राहणार.'' इंजि.सुरेश फड यांच्या नेतृत्वामुळे रिपब्लिकन सेना जिल्ह्यात नवी ताकद, नवी दिशा आणि नवी उर्जा घेऊन पुढे सरकत आहे.